सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२१/ 1577
दिनांक 20 JUN 2022

प्रति,
प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/खाजगी विनाअनुदानित
पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता डीबीटी पोर्टलवरील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांच्या कार्यवाहीबाबत (मुदतवाढ)**

**संदर्भ :** १. या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२१/२०३२ दिनांक १८.११.२०२१
२.या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२१/२३५४ दिनांक २१.१२.२०२१
३.या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२२/३७० दिनांक ०४.०२.२०२२
४. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२२/६६० दिनांक १२.०३.२०२२
५.या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२२/९९० दिनांक ०७.०४.२०२२
६. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२२/११९३ दिनांक १०.०५.२०२२
७. या कार्यालयाचे पत्र क्र. विकाअ/शिक्षण/डीबीटी/२०२२/१३९० दिनांक ०३.०६.२०२२
८. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.र ा.मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/डीबीटी/विकाप/२०२१-२२/ १४७ दिनांक १७.०६.२०२२

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ व ६ नुसार, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांबाबत संस्थांना, डीबीटी पोर्टलवरील योजनांच्या लाभासाठी विद्यार्थ्यांना अर्ज अंतिम मुदत दि.१५/०६/२०२२ पर्यंत भरण्यासाठी कळविण्यात आलेले होते.

**डीबीटी पोर्टलवर प्रदर्शित केल्यानुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज भरुन घेण्याकरीता तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता ज्या विद्यार्थ्यंचे अर्ज Sent Back अंतर्गत आहेत अशा विद्यार्थ्यांना देखील दिनांक ३०.०६.२०२२ पर्यंत Re-apply करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

तरी सर्व संस्थांना सुचित करण्यात येते की, डीबीटी पोर्टलवर शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता तंत्रशिक्षण संचालनायाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या लाभासाठी त्वरीत पात्र विद्यार्थ्यांकडून दिलेल्या मुदतीच्या आत अर्ज भरुन घ्यावेत. संस्थानी त्यांच्या लॉगीनमध्ये प्राप्त होणारे योजनांचे अर्ज प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या अटी व शर्तीनुसार तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन मुदतीपुर्वी पुढील कार्यवाहीसाठी पाठवावे. जर पात्र विद्यार्थी योजनेचा अर्ज भरण्यापासून वंचित राहिल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहील याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या संस्थांनी वर्षनिहाय डीबीटी डॅशबोर्डचे (सन २०२०-२१, २०२१-२२) अवलोकन करुन प्रलंबित अर्ज निकाली काढावेत तसेच विद्यार्थ्यांचे दुसऱ्या हप्त्याकरीता हजेरी भरण्याकरीता डीबीटी लॉगीनमध्ये प्राप्त होणारे अर्जाचे दररोज अवलोकन करुन त्वरीत निकाली काढावेत.

| अ.क्र. | डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्ट तपशील | संस्थेने मुदतीच्या आत करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | संस्था स्तरांवर तपासणीसाठी प्रलंबित अर्ज | संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये अर्ज तपासणीसाठी प्रलंबित न ठेवता संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार तपासणी (मंजूर/नामंजूर) करुन निकाली काढावेत. अन्यथा मुदतीनंतर संस्था स्तरांवर प्रलंबित अर्ज सिस्टिमव्दारे रद्द (Reject) करण्यात येतील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुख यांची राहील.तसेच जर विद्यार्थी संबंधित योजनेच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार पात्र नसेल तर असे अर्ज Send Back न करता संस्था स्तरांवरुन नामंजूर करावे. |
| २ | संस्थांनी विद्यार्थ्यांना परत पाठविलेले अर्ज (Sent Back अंतर्गत असलेले अर्ज) | संस्थांनी विद्यार्थ्यांना अर्जामध्ये असलेल्या त्रूटी दूर करण्याबाबत कळवून अर्ज भरुन घेऊन अंतिम मुदतीच्या आत निकाली काढण्यात यावे अन्यथा सिस्टीमव्दारे सदर अर्ज रद्द करण्यात येतील व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी व संस्था प्रमुख यांची राहील. |
| ३ | डीबीटी पोर्टलकडून अलॉटमेंट करण्यात न आलेले अर्ज (Not Alloted) | संस्थांनी Not Alloted विद्यार्थीच्या अर्जासोबत दिलेल्या कारणाचे अवलोकन करुन अपेक्षित त्रृटी दूर करण्याबाबत कळवून अर्ज भरुन घेऊन अंतिम मुदतीच्या आत निकाली काढण्यात यावे. |
| ४ | संस्था स्तरांवर विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्यासाठी प्रलंबित अर्ज | संबंधित संस्थांनी त्यांच्या लॉगीनमध्ये दुस-या हप्त्याची रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचा उपस्थिती अहवाल भरण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी. |

**तसेच विद्यार्थी केंद्र शासनाच्या (NSP Portal) व राज्य शासनाच्या (MahaDBT Portal) पोर्टलवरील योजनांपैकी कोणत्याही एकाच योजनेचा लाभार्थी असेल याबाबत संस्थांनी योग्य ती दक्षता घ्यावी. विद्यार्थ्यांने एकाच वर्षाकरिता दोन -दोन योजनांचा (केंद्र व राज्य शासनाच्या अशा दोन्ही योजनांचा) लाभ प्राप्त करुन घेतल्यास किंवा संस्थेमध्ये शिकत नसलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जास संस्थेकडून मंजूरी दिल्याचे आढळून आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.**

**प्र.सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत:**

**प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.